# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक १८/०३/२०२२ (शुक्रवार)

........................................................................

## खुनाचा प्रयत्न करणा–या आरोपीस अटक

**पोलीस स्टेशन कळमेश्वर :–** अंतर्गत मौजा कळमेश्वर येथील फिर्यादी हे दिनांक १६.०३.२०२२ चे २१.३० वा. दरम्यान, आपले दुकान बंद करून टु–व्हीलर गाडी क्र.एम.एच ४० बी.पी ६१०४ ने कळमेश्वर ते नागपुर रोडने जात असताना यातील **आरोपी क्र १)राकेश उर्फ गोलु चिंतामण पुरी वय २३ वर्ष रा. कारेमोरे ले आउट ब्राम्हणी कळमेश्वर जि नागपुर २) रूपेश रामकृष्ण भोडे वय २३ वर्षे रा. वार्ड क्र ५ कळमेश्वर** यांनी मिळुन दिनांक १९.०२.२०२२ रोजी संत रविदास महाराज जंयतीचे कार्यक्रमात जेवनाचे कारणावरून झालेले झगडा भांडणवरून **फिर्यादीस एकटा पाहुन जिवाचे मारण्याचे उद्देशने लोखंडी रॉडने डोक्यावर, छातीवर डाव्या पायावर व दोन्ही हातावर मारून जखमी केले.**

सदर प्रकरणी फिर्यादी नामे नतीन मारूती रघुवंशी वय ३६ वर्ष रा. वार्ड क्र १६ कळमेश्वर यांचे रिपोर्टवरून पो स्टे कळमेश्वर येथे आरोपीविरूध्द कलम ३०७, ३४१,३४, भादवी चा गुन्हा दाखल करण्यात आला, **आरोपीस अटक करण्यात आली असुन,** सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री आसिफराजा .बी. शेख पो.स्टे कळमेश्वर मो.क्र. ८४०८८०६६९० करीत आहेत.

## कोळसा चोरी करणा–या आरोपीतांवर कारवाई एकुण ६५,०००/– रु चा माल जप्त

**पोलीस स्टेशन कन्हान :–** यातील मौजा फुकटनगर झोपडपट्टी नाल्याजवळ ४ किमी पश्चिम कन्हान, दिनांक १७/३/२२ चे ०१/०० ते ०२/०० वा. दरम्यान यातील फिर्यादी यांचे गार्ड हे पोलीस स्टॉपसह खदान येथे पेट्रोलींग ची ड्युटी करीत असताना यातील आरोपी फिर्यादी व स्टॉफ यांना पाहुन पळुन गेले व सदर पिकअप गाडीमध्ये भरलेल्या कोळशाचे वजन **एकुण १३ टन अंदाजे किमती ६५,०००/– रु चा माल जप्त केला.** व कोल डिपो मध्ये जमा करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे संतोश इंद्रासन यादव वय ४३ वर्ष रा.खदान नं.३ कन्हान यांचे रिपोर्टवरून पो स्टे कन्हान येथे आरोपी नामे **१) फारूख अब्दुला शेख २) चिन्दु सिंग दोन्ही रा.फुकट नगर कांद्री कन्हान** यांचेविरूध्द कलम ३७९,३४, भादवी चा गुन्हा दाखल करण्यात आला, सदर गुन्हयाचा पुढील तपास पो हवा. नरेश वरखडे मो.नं. ९६३७००५३०३ करीत आहेत.

# देवलापार पोलीसांची मोहाफुल हातभट्टीवर धडक कारवाई
# एकुन १,०६,०००/— रू चा मुददेमाल जप्त

दिनांक १७/३/२२ रोजी होळी धुलीवंदन सनानिमीत्ताने पोलीस स्टेशन देवलापार मोहाफुल हातभट्टीवर कारवाई करीता नेमलेले पथक दारूबाबत रेड करणेकामी पेट्रोलिंग करीत असता मुकबीर द्वारे माहीती मिळाली कि, तुमडीटोला शिवारात जलयुक्त शिवार नाला काठेला भट्टी लावुन मोहाफुल दारू काढत आहे. अश्या खबरेवरून तुमडीटोला जलयुक्त शिवारात गेले असता भट्टीवरून दोन इसम पळुन जात असतांना दिसले. सदर परीसराची पाहणी केली असता खालीलप्रमाणे माल मिळुन आला.

जप्त माल —१) ४ काळया रगाचा रबरी टयुब मध्ये २४० लिटर मोहफुल गावठी दारू कि. ४८,००० रू २) २० प्लास्टीक पन्नीत मोहफुल एकुन १००० लीटर रसायन सडवा  किं. ५०,०००/— रू ३) चालु भटीतील केटली मध्ये १५ लिटर मोहफुल दारू कि. ३,०००/. रू ४) दारू गाळण्याकरीता लागणारे साहीत्य टिनाचे पिपे डम नरसाडे जळावु लाकडे एकुन ५,००० रू असा **एकुन १,०६,००० रू चा मुददेमाल जप्त करण्यात आला.**

सदरची कारवाई मा. विजयकुमार मगर, पोलीस अधिक्षक नाग्रा. मा अप्पर पोलीस अधिक्षक राहुल माकणीकर,  उपविभागीय पोलीस अधिकारी श्री राजेंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक श्री प्रविण बोरकुटे, पोलीस उपनिरीक्षक श्री केशव पुंजवाड, नायक पोलीस शिपाई संदीप नागोसे, शिवचरण नागपुरे, पोलिस शिपाई संतोष बाट, यांचे पथकाने केलेली आहे.

सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे.

## पोस्टे केळवद हद्दीत मौजा दाढेरा शिवारात मोहाफुल हातभट्टीवर पोलीसांचा छापा
## एकुण २,१८,९००/–रू चा मुद्देमाल जप्त

दिनांक १७.३.२२ रोजी होळी निमीत्य पेट्रोलिंग करीत करीत असता मुखबीर द्वारे मिळालेल्या खबरेवरून मौजा दाढेरा शिवारात रेड करून अवैधरित्या मोहाफुल हाथभट्टीवर दारू काढणा–या आरोपी नामे संदीप दिलीप राजपुत रा. पारधीबेडा तिडंगी तहसील कळमेश्वर यांचेवर कारवाई करून सदर प्रकरणात खालीप्रमाणे माल जप्त करण्यात आला.

जप्त माल:–१) ०८ निळा रंगाचा प्लास्टिक ड्रम मोहाफुल रसायन सडवा कि. १,६०,०००/– रु.

२) ८० लिटर तयार मोहा फुल गावठी दारू एकूण किमती १६,००० रुपये

३) ८ निळ्या रंगाचे खाली ड्रम असे किंमत ८,००० रुपये

४) लोखंडी ड्रम मध्ये उकळलेले मोहाफूल रसायनाने भरलेले कि. २०,०००/–.

५) खाली लोखंडी ड्रम प्रत्येकी किंमती २४००/–.

६) ३ टन जळावू लाकूड २,५००/–रुपये प्रमाणे एकूण ७,५०० /–

७) इतर दारू गाळण्याचे साहित्य पाईप जर्मन घमिला इतर साहित्य एकूण किंमत ५,०००/–रुपये

असा एकूण **२,१८,९००/–रुपयांचा** मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूध्द दारूबंदी कायद्याखाली गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरची कारवाई मा. विजयकुमार मगर, पोलीस अधिक्षक नाग्रा. मा.श्री राहुल माकणीकर, अप्पर पोलीस अधिक्षक ना.ग्रा. मा.पुजा गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग, यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक श्री अमितकुमार आत्राम, पोलीस उपनिरीक्षक श्री उमेश नासरे, सफौ किशोर ठाकरे, नायक पोलीस शिपाई रविंद्र चटप, पोलिस शिपाई सचिन येळकर, धोंडुतात्या देवकने, पंकज कोवाड, चालक गुणवत्ता डाखोळे, तसेच होमगार्ड सैनिक निळकंठ बोंद्रे, सुनिल झाडे, तसेच उत्पादन शुल्क विभाग नागपुर येथील दुय्यम निरीक्षक श्री एस.पी वायाळ, सहा. दुय्यम निरीक्षक आर ठोंबरे, प्रशांत गेडाम, अमोल बोथले, व चालक एस एन शिंदे यांनी केलेली आहे.

सदर बातमीचा फोटो सोबत जोडला आहे.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपुर**